रे.दि.मु.नं.१७/२०१७
नि.क्र.२०६लगत

**<u>वादीचा उलटतपास प्रतिवादी क्र.१ ,२६,२२-१ ते २२-३ यांच्यातर्फे विधीज्ञ श्रीमती एस. ए. गिडये यांचेकडुन शपथेवर सुरु</u>** -

**१०.** हे म्हणणे खरे आहे की, सोनू गोपाळ शिंदे यांचे एकटयाचे नाव दावा मिळकत क्रमांक १ ते ८ रेकॉर्ड ऑफ राईटचा कायदा आल्यानंतर कुळ म्हणून दाखल झाले. हे मला सांगता येणार नाही की, फेरफार नोंद क्रमांक ७६१ अन्वये त्याचे कुळ म्हणून दावा मिळकत क्रमांक १ ते ८ ला नाव दाखल झाले. हे म्हणणे खरे आहे की, फेरफार नोंद क्रमांक ७६१ आजतागायत आव्हीनीत केली नाही. साक्षीदार सांगतो की, आम्ही त्यावेळेस लहान होतो, त्यामुळे आव्हानीत केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस मी लहान होतो त्यामुळे ती फेरफार मी आव्हानीत केली नाही, हे खोटे सांगत आहे.

**११.** हे म्हणणे खरे आहे की, गंगाराम शिंदे, गणपत शिंदे, श्रीपत शिंदे ,गोविंद शिंदे, अनंत शिंदे यांनी देखील ही फेरफार आव्हानीत केली नाही. हे मला माहिती नाही की, फेरफार नोंद ९४० अन्वये सोनू शिंदे यांच्या पश्चात त्यांच्या वारसांची नावे दावा मिळकत क्रमांक १ ते ८ या मिळकतींना लागली अगर कसे. हे मला माहिती नाही की, कुळ कायदयाअंतर्गत दावा मिळकतीची विक्री देखील सुरेश सोनू शिंदे यांच्या नावे झालेली आहे.

**१२.** हे म्हणणे खरे आहे की, उपविभागीय अधिकारी रत्नागिरी यांच्याकडे मी या विक्री विरूध्द आव्हानीत करण्यासाठी विलंब माफीचा अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझे अपिल मुदतीत दाखल नसल्याने विलंबाच्या कारणास्तव फेटाळण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, तो आदेश आजतागायत कायम आहे. हे म्हणणे खरे आहे की, ज्या मिळकती सोनू गोपाळ शिंदे यांना रेकॉर्ड ऑफ राईट कायदा

अस्तित्वात आल्यानंतर एकटयाच्या नावे कुळ म्हणून दाखल झाल्या त्या मिळकतीपैकी स. नं. ७ हि. नं. २ ही मिळकत प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. १३ ते १६ चे पूर्वाधिकारी प्रमोद शिंदे म्हणजेच माझा भाऊ यांना नोंदणीकृत खरेदीखताने विकली.

**उलटतपास पुढील तारखेपर्यत तहकुब.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

सही/-

**(श्रुती ह.पाटील)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर**
**देवरुख**

**दि. १६/१०/२०२४**